04 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांग व्यक्तींप्रती जाणीव निर्माण करा

## डॉ. विनय कुमार पाठक : शिवाजी विद्यापीठात विशेष परिसंवाद

**कोल्हापूर, ता. ३ : 'दिव्यांग व्यक्तींच्या उन्नतीसाठी काम करणे हीच खरी मानवसेवा आहे', असे प्रतिपादन अखिल भारतीय विकलांग चेतना परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय कुमार पाठक यांनी आज येथे केले. 'दिव्यांग व्यक्तींप्रती समाजात चेतना, जाणीव-जागृती निर्माण करणे फार महत्त्वाचे कार्य आहे. यामध्ये प्रत्येक व्यक्तीचे योगदान मोलाचे ठरते', असेही त्यांनी सांगितले.**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात दिव्यांगांविषयी आयोजित विशेष परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. विनय कुमार पाठक. शेजारी डॉ. प्रभंजन माने, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. मनोहर वासवानी.

शिवाजी विद्यापीठातील हिंदी व इंग्रजी अधिविभाग आणि अखिल भारतीय विकलांग चेतना परिषद (छत्तीसगड, बिलासपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विकलांग विमर्श के निकष पर भाषा और साहित्य' विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. निलांबरी सभागृहात चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

डॉ. पाठक म्हणाले, 'विकलांगता निश्चित स्वरूपात दूर होऊ शकते. अशा व्यक्ती अनेक कामे करण्यास सक्षम असतात. समाजाने त्यांच्याप्रती फक्त दयाभाव दाखविण्यापेक्षा त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी आणि स्वावलंबी होण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. त्यामुळे समाजाच्या आणि देशाच्या प्रगतीमध्ये हातभार लावणे सहज शक्य होईल.'

डॉ. शिर्के यांनी दिव्यांगांच्या प्रश्नांसंदर्भात भारतीय भाषांसोबत सामाजिक व विज्ञान शाखांच्या वतीने संयुक्त संशोधन होणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने या दोनदिवसीय राष्ट्रीय परिसंवादामधील विचारमंथन मार्गदर्शक स्वरूपाचे ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने, हिंदी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. गीता दोड्डमणी यांनी हिंदीतून मराठीत अनुवादित केलेल्या 'विकलांग विमर्श: दशा आणि दिशा' पुस्तकाचे प्रकाशन झाले.

डॉ. सुषमा चौगले व मृणाल मोहिते यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मनोहर वासवानी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अक्षय सरवदे यांनी आभार मानले. परिसंवादात हैदराबाद येथील डॉ. अमित कुमार, दिल्लीतील डॉ. प्रीती गच्चे, छत्तीसगड उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती डॉ. चंद्रभूषण वाजपेयी, परिषदेचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. मदन मोहन अग्रवाल, डॉ. सुरेश माहेश्वरी, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. दीपक भादले, डॉ. प्रकाश मुंज यांच्यासह देशभरातून शंभरहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

04 JAN 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांगांप्रति समाजामध्ये जाणीव महत्त्वाची : डॉ. पाठक

कोल्हापूर : प्रतिनिधी

दिव्यांग व्यक्तींप्रति समाजामध्ये चेतना, जाणीव-जागृती निर्माण करणे फार महत्त्वाचे कार्य आहे. यामध्ये प्रत्येक व्यक्तीचे योगदान मोलाचे ठरते, असे प्रतिपादन अखिल भारतीय विकलांग चेतना परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनयकुमार पाठक यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील हिंदी व इंग्रजी अधिविभाग आणि अखिल भारतीय विकलांग चेतना परिषद (छत्तीसगड, बिलासपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने 'विकलांग विमर्श के निकष पर भाषा और साहित्य' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात दिव्यांगांविषयी आयोजित विशेष परिसंवादाच्या उद्घाटन समारंभात बोलताना डॉ. विनयकुमार पाठक. सोबत मान्यवर.

नीलांबरी सभागृहात झालेल्या या चर्चासत्रात डॉ. पाठक म्हणाले, दिव्यांग व्यक्तींच्या उन्नतीसंदर्भात काम करणे हीच खरी मानव सेवा आहे. विकलांगता निश्चित स्वरूपात दूर होऊ शकते. अशा व्यक्ती अनेक कामे करण्यास सक्षम असतात. समाजाने त्यांच्याप्रति फक्त दयाभाव दाखवण्यापेक्षा त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी आणि स्वावलंबी होण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.

अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, दिव्यांगांच्या प्रश्नांसंदर्भात भारतीय भाषांसोबत सामाजिक व विज्ञान शाखांच्या वतीने संयुक्त संशोधन होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने हे विचारमंथन मार्गदर्शक ठरेल.

यावेळी इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. प्रभंजन माने, हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. गीता दोडमणी यांनी हिंदीतून मराठीत अनुवादित केलेल्या 'विकलांग विमर्श : दशा आणि दिशा' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. मनोहर वासवानी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अक्षय सरवदे यांनी आभार मानले. डॉ. सुषमा चौगले, मृणाल मोहिते यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी हैदराबाद येथील इंग्रजी व विदेशी भाषा विद्यापीठाचे डॉ. अमित कुमार, दिल्लीतील डॉ. प्रीती गच्चे, छत्तीसगड उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती डॉ. चंद्रभुषण वाजपेयी, परिषदेचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. मदन मोहन अग्रवाल, डॉ. सुरेश माहेश्वरी, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. दीपक भादले, डॉ. प्रकाश मुंज आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JAN 2025
लोकमत

# दिव्यांगांप्रति जाणीव-जागृती निर्माण व्हावी

## डॉ. विनय कुमार पाठक : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : दिव्यांग व्यक्तींप्रति समाजामध्ये चेतना, जाणीव-जागृती निर्माण करणे फार महत्त्वाचे कार्य आहे. यामध्ये प्रत्येक व्यक्तीचे योगदान मोलाचे ठरते, असे प्रतिपादन अखिल भारतीय विकलांग चेतना परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय कुमार पाठक यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठातील हिंदी व इंग्रजी अधिविभाग आणि अखिल भारतीय विकलांग चेतना परिषद (छत्तीसगड ) यांच्या वतीने 'विकलांग विमर्श के निकष पर भाषा और साहित्य' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. याचे उद्घाटन झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.



शिवाजी विद्यापीठात दिव्यांगांविषयी आयोजित विशेष परिसंवादात डॉ. विनय कुमार पाठक यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. पाठक म्हणाले, दिव्यांग व्यक्तींच्या उन्नतीसंदर्भात काम करणे हीच खरी मानव सेवा आहे. विकलांगता निश्चित स्वरूपात दूर होऊ शकते. समाजाने त्यांच्याप्रति फक्त दयाभाव दाखविण्यापेक्षा त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी आणि स्वावलंबी होण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. डॉ. प्रभंजन माने, हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी मनोगते व्यक्त केली.

डॉ. मनोहर वासवानी यांनी स्वागत केले. डॉ. अक्षय सरवदे यांनी आभार मानले. डॉ. सुषमा चौगले व मृणाल मोहिते यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. अमित कुमार, दिल्लीतील डॉ. प्रीती गच्चे, माजी न्यायमूर्ती डॉ. चंद्रभूषण वाजपेयी, डॉ. मदन मोहन अग्रवाल, डॉ. सुरेश माहेश्वरी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JAN 2025

पुण्यनगरी

# भूचुंबकत्व संशोधनास 'आयआयजी'चे शिवाजी विद्यापीठास सहकार्य

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अवकाश आणि भूचुंबकत्त्वाच्या क्षेत्रात संशोधनाच्या व्यापक संधी उपलब्ध असून, त्यांचा शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. भारतीय भूचुंबकत्व संस्थेचे संयुक्त संशोधन प्रकल्पांना सर्वतोपरी सहकार्य लाभेल, अशी ग्वाही भारतीय भूचुंबकत्व संस्थेचे (आयआयजी) संचालक डॉ. ए. पी. डिमरी यांनी शुक्रवारी दिली. शिवाजी विद्यापीठाचा भौतिकशास्त्र अधिविभाग आणि केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागांतर्गत स्वायत्त असलेल्या नवी मुंबई येथील भारतीय भूचुंबकत्त्व संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'अ-टमॉस्फीअर-आयनोस्फीअर डायनॅमिक्स : ऑब्झर्व्हेशन्स अँड डेटा ॲनालिसिस' ही एकदिवसीय कार्यशाळा शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात पार पडली. कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

डॉ. डिमरी म्हणाले, गेल्या दोन दिवसांत शिवाजी विद्यापीठातील



एम. एफ. रडार सुविधा, तसेच पन्हाळा येथील विद्यापीठाचे अवकाश केंद्र यांची पाहणी केली. या सुविधा अद्ययावत असून, त्याद्वारे अतिशय उत्तम दर्जाचे माहिती संकलन या दोन्ही ठिकाणी होत आहे. तथापि, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी संशोधनासाठी केवळ या माहितीवर अवलंबून न राहता आयआयजीला भेट द्यावी. तेथे विविध प्रकारच्या संशोधन सुविधा आणि डाटा उपलब्ध आहे. त्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्यांना त्यांचे संशोधन अधिक परिपूर्ण करता येईल. अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रा. आर. व्ही. भोसले यांनी पन्हाळा अवकाश केंद्र उभारणीसाठी घेतलेले परिश्रम आणि पाठपुरावा यांची माहिती दिली. यावेळी पदार्थविज्ञान अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राजीव व्हटकर यांनी आभार मानले.

कार्यक्रमास डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. सत्यजित पाटील, डॉ. सिबा दास, डॉ. विजय कुंभार, डॉ. मकसूद वाईकर आदी उपस्थित होते. कार्यशाळेत एस. गुरुबरण, डॉ. आलोक ताओरी, डॉ. सतीशकुमार, डॉ. श्रीपती, डॉ. गोपी सिमला आणि डॉ. नवीन परिहार या तज्ज्ञांनी विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन केले.

04 JAN 2025

सकाळ


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भूचुंबकत्व क्षेत्रात संशोधनाच्या संधी

## डॉ. ए. पी. डिमरी : विद्यापीठात एकदिवसीय कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३ : 'अवकाश आणि भूचुंबकत्वाच्या क्षेत्रात संशोधनाच्या व्यापक संधी उपलब्ध असून, त्यांचा शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. भारतीय भूचुंबकत्व संस्था संयुक्त संशोधन प्रकल्पांना सर्वतोपरी सहकार्य करेल', अशी ग्वाही भारतीय भूचुंबकत्व संस्थेचे (आय.आय.जी.) संचालक डॉ. ए. पी. डिमरी यांनी आज येथे दिली.**



कोल्हापूर : मार्गदर्शन करताना डॉ. ए. पी. डिमरी.

शिवाजी विद्यापीठाचा भौतिकशास्त्र अधिविभाग आणि केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागांतर्गत स्वायत्त असलेल्या नवी मुंबई येथील भारतीय भूचुंबकत्व संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ॲटमॉस्फिअर-आयनोस्फिअर डायनॅमिक्स : ऑब्झर्व्हेशन्स अँड डेटा ॲनालिसिस' या एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते. पदार्थविज्ञान अधिविभागाच्या सभागृहात कार्यशाळा झाली.

डॉ. डिमरी म्हणाले, 'गेल्या दोन दिवसांत विद्यापीठातील एम. एफ. रडार सुविधा तसेच पन्हाळा येथील विद्यापीठाचे अवकाश केंद्र यांची पाहणी केली. या सुविधा अद्ययावत असून, त्याद्वारे अतिशय उत्तम दर्जाचे माहिती संकलन या दोन्ही ठिकाणी होत आहे. तथापि, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी संशोधनासाठी केवळ या माहितीवर अवलंबून न राहता आय.आय.जी.ला भेट द्यावी. तेथे विविध प्रकारच्या संशोधन सुविधा आणि डाटा उपलब्ध आहे. त्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्यांना त्यांचे संशोधन अधिक परिपूर्ण करता येईल. विद्यापीठातील संशोधन सुविधा पाहून आपण अत्यंत प्रभावित झालो असून, आय.आय.जी.सह आयुका, पुणे, इस्रो या राष्ट्रीय आघाडीच्या संस्थांच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठात एक अधिक व्यापक स्वरूपाची परिषद आयोजित करण्याचा मानस आहे.'

डॉ. पाटील यांनी प्रा. आर. व्ही. भोसले यांनी पन्हाळा अवकाश केंद्र उभारणीसाठी घेतलेले परिश्रम आणि पाठपुरावा यांची माहिती दिली.

कार्यशाळेत एस. गुरुबरण, डॉ. आलोक ताओरी, डॉ. सतीशकुमार, डॉ. श्रीपती, डॉ. गोपी सिमला आणि डॉ. नवीन परिहार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. सत्यजित पाटील, डॉ. सिबा दास, डॉ. विजय कुंभार, डॉ. मक्सूद वाईकर आदी उपस्थित होते. पदार्थविज्ञान अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राजीव व्हटकर यांनी आभार मानले.

04 JAN 2025 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'भूचुंबकत्व संशोधनासाठी विद्यापीठाला सहकार्य करू'

प्रतिनिधी
कोल्हापूर

अवकाश आणि भूचुंबकत्वाच्या क्षेत्रात संशोधनाच्या व्यापक संधी उपलब्ध असून त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. भारतीय भूचुंबकत्व संस्थेचे संयुक्त संशोधन प्रकल्पांना शिवाजी विद्यापीठास सर्वोतोपरी सहकार्य लाभेल, असे प्रतिपादन भारतीय भूचुंबकत्व संस्थेचे (आय.आय.जी.) संचालक डॉ. ए. पी. डिमरी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा भौतिकशास्त्र अधिविभाग आणि केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभाग व नवी मुंबई येथील भारतीय भूचुंबकत्व संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ॲटमॉस्फिअर-आयनोस्फिअर डायनॅमिक्स : ऑब्झर्व्हेशन्स ॲंड डेटा ॲनालिसिस (AIDON 2025) या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन



प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते.

डॉ. डिमरी म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील एम. एफ. रडार सुविधा तसेच पन्हाळा येथील विद्यापीठाचे अवकाश केंद्र यांची पाहणी केली. अद्ययावत सुविधांद्वारे उत्तम दर्जाचे माहिती संकलन होत आहे. विद्यार्थ्यांनी संशोधनासाठी माहितीवर अवलंबून न राहता आय.आय.जी.ला भेट द्यावी. तेथील माहितीच्या आधारे विद्यार्थ्यांना संशोधन अधिक परिपूर्ण करता

- डॉ. ए. पी. डिमरी यांचे प्रतिपादन
- एकदिवसिय कार्यशाळा संपन्न

येईल, असे त्यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी पन्हाळा अवकाश केंद्राचा आढावा घेतला. कोल्हापूरचे अवकाश संशोधन आणि भूचुंबकत्व या क्षेत्रांच्या दृष्टीने वैज्ञानिक महत्त्व व भौगोलिक वैशिष्ट्य स्पष्ट केले.

कार्यशाळेत एस. गुरुबरण, डॉ. आलोक ताओरी, डॉ. सतीशकुमार, डॉ. श्रीपती, डॉ. गोपी सिमला आणि डॉ. नवीन परिहार यांनी मार्गदर्शन केले. व्याख्यानासह डेटा विश्लेषण तंत्रांवरील प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. कार्यशाळेत देशभरातील राष्ट्रीय संशोधन संस्थांमधील शंभरहून अधिक युवा संशोधक, पदव्युत्तर व पीएच.डी. स्तरावरील विद्यार्थी

**संशोधनाची व्यापक परिषद घेऊ**

शिवाजी विद्यापीठातील संशोधन सुविधा अद्ययावत आहेत. आयआयजीसह आयुका, पुणे, इस्रो आदी राष्ट्रीय आघाडीच्या संस्थांच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठात व्यापक स्वरुपाची परिषद आयोजित करण्याची इच्छा निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने नजीकच्या काळात प्रयत्न करू, असेही डॉ. डिमरी यांनी सांगितले.

सहभागी झाले.

यावेळी डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी स्वागत केले. डॉ. राजीव व्हटकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. सत्यजीत पाटील, डॉ. सिबा दास, डॉ. विजय कुंभार, डॉ. मक्सूद वाईकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

04 JAN 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

कोल्हापूर : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यापीठातील महिला शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. प्रल्हाद माने, विद्यार्थिनी वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. मीना पोतदार, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. कविता वड्राळे आदी उपस्थित होते.

04 JAN 2025 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# चंद्र, शुक्र, शनिच्या संगमाचे दर्शन

■ आजही चंद्र, शुक्रना एकत्र पाहण्याची संधी

**सुर्यास्तानंतर दोन तासांनी दर्शन**

शुक्रवारी सायंकाळी दोन तासांनी चंद्र, शुक्र व शनि एकत्र येताना दिसले. अंधार पडल्यानंतर आकाशे निरभ्र असल्याने चंद्र, शुक्र व शनि अधिक जवळ आल्याचे दिसले. हा अनोखा क्षण टिपण्याचा योग खगोलप्रेमींना मिळाला. आजही हा क्षण पाहण्याची संधी मिळणार आहे.

प्रतिनिधी

कोल्हापूर

चंद्र, शुक्र आणि शनि शुक्रवारी रात्री आकाशात एकत्र दिसले. त्यांच्या मनमोहक संगमाचे दृश्य पाहण्याचा आनंद नागरिकांनी घेतला. हे नयनरम्य दृश्य खगोलप्रेमींसाठी एक अनोखी संधी असल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी सांगितले.

आजही चंद्र शनिच्या अधिक जवळ येणार आहे. जिथे आकाश मोकळं असेल, तेथून हे दृश्य पाहण्यासाठी उत्तम संधी असेल. शुक्राचा तेजस्वी प्रकाश आणि शनीची वलयं यामुळे हे दृश्य अधिक रोमांचक ठरणार आहे. खगोलप्रेमींना टेलिस्कोपद्वारे किंवा उघड्या डोळ्यांनी मनमोहक दृष्य पाहता येईल. अवकाशातील या मिलापाचा नागरिकांनी आनंद घ्यावा, असे आवाहन अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

कोल्हापूर : चंद्र, तेजसी शुक्र व शनी आकाशात शुक्रवारी रात्री एकत्र दिसले. या मनमोहक संगमाचे नयनरम्य दृश्य टिपले आहे छायाचित्रकार रियाज ट्रेनर यांनी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

04 JAN 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचे आज अखेर २०५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु झालेल्या आहेत. शुक्रवारी १३८ परीक्षा केंद्रावर विविध ४६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने पार पडल्या आहेत. परीक्षांसाठी २ हजार ७५५ विद्यार्थी उपस्थित होते. शुक्रवारी ९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले असून आजअखेर एकूण २०५ निकाल जाहीर झाले आहेत. गैरप्रकारावर नियंत्रणासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JAN 2025
पुण्यनगरी

# डॉ. ऐश्वर्या पवार यांच्या संशोधनास अनुदान

**पेठवडगाव :** येथील श्री विजयसिंह यादव महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. ऐश्वर्या पवार यांना शिवाजी विद्यापीठाकडून 'फॉर्म्युलेशन ऑफ नोवेल वर्मीकंपोस्ट वेर्मिवाश फ्रॉम देशी काऊ (गिर) डंग अँड युरिन एक्स्ट्राकट फॉर अॅग्रीकल्चर अॅप्लिकेशनस्' या संशोधन प्रकल्पास डायमंड ज्युबिली रिसर्च इनिशिएशन या योजनेंतर्गत अनुदान मिळाले.



याबद्दल संस्था अध्यक्ष गुलाबराव पोळ, उपाध्यक्ष विजयादेवी यादव, सचिव विद्या पोळ, संचालक राजकुमार पोळ, प्राचार्य डॉ. अशोक चव्हाण यांनी अभिनंदन केले. डॉ. आर. एस. डुबल, डॉ. आर. एम. गेजगे, डॉ. जितेश दौंडे यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 4 JAN 2025
तरुण भारत

# प्रा.डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय आंतर विभागीय 'सॉफ्टबॉल'साठी पात्र

**शाहूवाडी :** शिवाजी विद्यापीठ व कोल्हापूर विभागीय क्रीडा परिषदेद्वारा जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापुरातील महावीर महाविद्यालयात आयोजित सॉफ्टबॉल स्पर्धा यशस्वीरित्या पार पडली. यामध्ये सलग तीन वर्ष तिसरा क्रमांक घेऊन्न रयत शिक्षण संस्थेचे शाहूवाडी तालुक्यातील मलकापूर पेरीड येथील प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय विजयी होऊन्न आंतर विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले. प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी विजयी संघाचे अभिनंदन केले. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सुहास वाघ यांनी संघाला मार्गदर्शन केले.